निशाणी क्र. २१/क

सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - जनार्दन पांडुरंग म्हात्रे,
वय - ६१ वर्षे
हुद्दा - सेवानिवृत्त,
पत्ता - आमटीम, ता. पेण, जि. रायगड.

**<u>सरतपास सरकारी वकील श्रीमती सायली चव्हाण यांचे मार्फत शपथेवर सुरु....</u>**

१) मी खालापूर पोलिस स्टेशन येथे पोलिस हवालदार या पदावर सन २०१५ ते २०२२ या कालावधी मध्ये कार्यरत होतो. दि. ०२/०२/२०२० रोजी खबर देणार कादर आयुब सैय्यद यांनी दिलेली खबर ठाणे अंमलदार यांनी गु.र.क्र. २१/२०२० नुसार नोंद करुन घेतली. त्यानंतर सदर गुन्ह्याचा तपास माझ्याकडे देण्यात आला. सदरचा गुन्हा माझ्याकडे तपासकामी देते वेळी मला फिर्याद, प्रथम खबर अहवाल, एम.जी.एम. हॉस्पीटल कामोठे यांचा रिपोर्ट, इन्क्वेस्ट पंचनामा, वारस पावती, शवविच्छेदन अहवाल, एम.एल.सी. चे कागदपत्र ही कागदपत्रे देण्यात आली होती. तपासादरम्यान मी दि. ०५/०२/२०२० रोजी दोन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळ हे वनवठे गावच्या हद्दीत खोपोली पेण रोडवर होते. पंचनाम्याच्या वेळी घटनास्थळ साक्षीदार मुजीब सय्यद यांनी दाखवले. पंचनाम्याच्या वेळी घटनास्थळावर काहीही खानाखुणा दिसून आल्या नाहीत. अपघातग्रस्त वाहन क्र. एम.एच. ०६ ए.टी. ५६६५ हीचे समोरील बाजुचे नुकसान झाले होते. तसेच दोन्ही बाजुचे इंडीकेटर तुटलेले, चेसीस दबलेली, समोरील टायर वरील बंपरची मोडतोड झालेली दिसत होती. तसेच दुसरे अपघातग्रस्त वाहन एम.एच. १६ सी.सी. ४४५१ हीचे ड्रायव्हर बाजुकडील हेडलाईट तुटलेले व समोरील शोचा भाग दबलेला दिसत होता. त्याप्रमाणे मी घटनास्थळ पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला निशाणी १९ वरील पंचनामा तोच आहे.. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पंचनाम्याच्या वेळी पोलिस नाईक सहाने यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये फोटो काढले होते. आता मला दाखवण्यात आलेले फोटो तेच आहेत. फोटोंना आर्टीकल अ व ब देण्यात आले. त्यानंतर मी पोलिस हवालदार सहाने यांचे ६५-ब

नुसारचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेवून दोषारोप पत्रात सामील करुन घेतले. त्यानंतर मी जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त करुन दोषारोप पत्रात सामील करुन घेतले. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. अपघातातील दोन्ही वाहनांची आरटीओ यांच्याकडून तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल दोषारोप पत्रात सामील करुन घेतले. त्यानंतर मी अपघातातील वाहनांची कागदपत्रे दोषारोप पत्रात सामील करुन घेतले. मी केलेल्या एकंदरीत तपासामध्ये सदरचा अपघात आरोपीने त्याच्या ताब्यातील टेम्पो क्र. एम.एच. १६ सीसी ४४५१ हा खोपोली पेण रोडने चालवित घेवून येत असताना रॉंग साईडला जावून समोरुन येणा-या मोटर सायकलला ठोकर मारुन अपघात करुन निसार सय्यद व मुजीब सय्यद यांच्या गंभीर दुखापतीस व निसार सय्यद यांच्या मृत्युस कारणीभुत झाला. त्यामुळे मी त्याच्या विरुध्द दोषारोप पत्र पाठविले. आरोपीला पाहील्यास मी ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर नाही.

**सरतपास संपला.**

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. एम. व्ही. सुरावकर यांचेमार्फत सुरु...</u>**

२) हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाला त्यावेळी खबर देणार कादर सय्यद हा घटनास्थळावर हजर नव्हता. घटना दि. २९/०१/२०२० रोजी घडलेली असून मी घटनास्थळ पंचनामा दि. ०५/०२/२०२० रोजी केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्यासाठी गेलो त्यावेळी तेथे रस्त्याचे काम सुरु होते. मी तपासादरम्यान रस्ते वाहतुक यांना कोणताही पत्र व्यवहार केला नव्हता. अपघात रात्रीच्या वेळी घडला होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघात घडला त्यावेळी रस्त्याचे काम करणारे कोणीही कर्मचारी किंवा अधिकारी घटनास्थळावर हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अपघात पेण खोपोली रस्त्यावर झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, जेथे अपघात झाला तेथे थोडेसे वळण आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील रस्त्याच्या अर्ध्या भागाचे काम सुरु होते. मला पंचनाम्यासाठी गेलो त्यावेळी बॅरीकेट्स कोने व सुचना फलक लावलेले दिसले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते फोटोमध्ये दिसत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही पंचनाम्यासोबतचा नकाशा दिसत्या परिस्थिती नुसार काढतो. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यासोबत असलेल्या नकाशामध्ये

कोठेही बॅरीकेट्स कोने व सुचना फलक दाखवण्यात आलेले नाही. रात्रीच्या वेळी खोदलेला रस्ता दाखवण्यासाठी रस्ता व्यवस्थापनाकडून कोणत्याही व्यक्तीची नेमणुक करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्याच्या वेळी अपघातातील वाहने घटनास्थळावर नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी वाहने पोलिस स्टेशनला होती. मी दुचाकी चालकाचा वाहन चालविण्याचा परवाना व विम्या संबंधीचे कागदपत्र पाहीले होते का हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दुचाकी चालकाकडे वाहन चालविण्याचा कोणताही परवाना नव्हता व त्याला वाहनही चालविता येत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावर कोणतीही मोजमापे घेतलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळावरुन काहीही जप्त केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी आर.टी.ओ. यांच्याकडून वाहनांची तपासणी झाली त्यावेळी वाहने पोलिस स्टेशनला होती. हे म्हणणे खरे नाही की, अपघातात आरोपीची काहीही चुक नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात दुचाकी चालकाच्या चुकीमूळे झालेला आहे. पंचनाम्याच्या वेळी बघ्यांची गर्दी जमली नव्हती. मी पंचांना स्वतः फोन करुन बोलवले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे फोन नंबर माझ्याकडे होते. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचे जबाब एकसारखे घेतलेले असून ते कॉपी पेस्ट केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, जखमी व्यतिरीक्त घटना प्रत्यक्ष पाहणारा एकही साक्षीदार मला तपासादरम्यान मिळून आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**

**फेर तपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.**

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.02.18 14:00:22 +0530

( डी. एस. खोत )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालपूर.
दिनांक - १८/०२/२०२६